पुढारी

विद्यापीठ अधिविभाग, संलग्न महाविद्यालयातील रिक्त जागांसाठी १२ नोव्हेंबरला पुनर्प्रवेश परीक्षा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील अधिविभाग, संलग्नित महाविद्यालयातील विविध अभ्यासक्रमांच्या रिक्त राहिलेल्या जागांसाठी पुनर्प्रवेश परीक्षा दि. १२ नोव्हेंबर रोजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभाग येथे होणार आहे. एम.एस्सी.(गणित), एम.एस्सी. (फिजिक्स), बी.जे, एम.जे. व मास कम्युनिकेशन, बी.लिब., एम.लिब., एम.एस्सी. (पर्यावरणशास्त्र), एम.एस्सी. (संगणकशास्त्र), एम.एस्सी. (मेडिकल अँड इनफॉर्मेशन मॅनेजमेंट), एम.बी.ए., एम.टेक., एम.एस.डब्ल्यू. (यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट), एम.एस्सी.(फूड सायन्स अँड न्युट्रीशन), एम.ए. (रशियन) या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी पुनर्प्रवेश परीक्षेच्या अधिक माहितीसाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील लिंकला भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

सकाळ

दूर शिक्षणच्या प्रवेशासाठी पूर्व नोंदणी आवश्यक

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ७ : शिवाजी विद्यापीठाच्या दूर शिक्षण विभागातून कोणत्याही अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठी आता पूर्व नोंदणी करावी लागणार आहे. दूर शिक्षण विभागाच्या लिंकवर जाऊन एक फॉर्म विद्यार्थ्यांना भरावा लागणार आहे. कोणत्या अभ्यासक्रमाला किती विद्यार्थी प्रवेश घेऊ इच्छितात, याची निश्चित आकडेवारी दूर शिक्षण विभागाकडे येईल. नोकरी किंवा व्यवसाय करणाऱ्यांना शिक्षण घेता यावे, यासाठी विद्यापीठाने दूर शिक्षण विभाग सुरू केला आहे. पूर्वी ज्या विद्यार्थ्यांना पदवी घेतलेल्या विषयाखेरीज अन्य विषयांत पदव्युत्तर शिक्षण घ्यायचे असेल, त्यांना फॅकल्टी चेंज ही परीक्षा द्यावी लागत होती. यामुळे प्रवेशाची प्रक्रिया विनाकारण लांबत होती. ही गोष्ट लक्षात घेऊन या वर्षीपासून फॅकल्टी चेंजची परीक्षा रद्द करण्याचा निर्णय विद्यापीठ प्रशासनाने घेतला.

त्यामुळे विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला. या वर्षीपासून पूर्वनोंदणीही सुरू केली आहे. यात विद्यार्थ्यांनी दूर शिक्षण विभागाच्या लिंकवर जाऊन एक फॉर्म भरायचा आहे. यामध्ये त्यांनी नाव, पत्ता, संपर्क क्रमांक, ई-मेल, ज्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश हवा, हे त्याचे नाव हे भरायचे आहे. त्यानंतर पूर्वनोंदणी होतच याशिवाय टेलीग्रामच्या एका ग्रुपमध्येही विद्यार्थी जोडला जातो.

या ग्रुपवर प्रवेशाबाबतची माहिती मिळते. याशिवाय दूर शिक्षण विभागाकडूनही प्रवेशाची तारीख, आवश्यक असणारी कागदपत्रे, प्रवेशाची अंतिम तारीख यांसह अन्य गोष्टी कळवण्यात येणार आहेत.